# जिल्हाधिकारी लातूर यांचे कार्यालय

## (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण)

वाचा: १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि. १४.०३.२०२०
३. अधिसूचना सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १४.०३.२०२०
४. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७
५. महाराष्ट्र शासन क्र.करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०
६. महाराष्ट्र शासन अधिसुचना, No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक १७.०४.२०२०, ०१.०५.२०२०, ०३.०५.२०२०, ०७.०५.२०२०
७. या कार्यालयाचे आदेश (उपचीटनिस) क्र.२०२०/एमएजी/कक्ष-१/कावि- दिनाक:-१९.०४.२०२०, ०३.०५.२०२०
८. या कार्यालयाचे समक्रमांकित आदेश क्र.२०२०/आ.व्य./कावि-५५९ दिनांक:-२६.०४.२०२०

क्र.२०२०/आ.व्य./कावि-५८५ दिनांक:-०९.०५.२०२०

**आदेश :-**

**विषय:** राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.
**(परराज्यातून/ परजिल्हयातून येणा-या व्यक्तींच्या संदर्भात करावयाची कार्यवाही बाबत.)**

ज्याअर्थी संदर्भीय शासन पत्रकान्वये शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररीत्या निर्गमित करण्यात आली आहे. त्याअन्वये जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

त्याअर्थी **मी, जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण** लातूर जिल्हयातील नागरी जे परराज्यात / परजिल्हयात अडकले जिल्हयात संबंधित सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगीने जिल्हयात प्रवेश करणा-या नागरिकांची वैद्यकीय तपासणी करण्यात यावी. तपसणीअंती इंफ्लूएन्झाची लक्षणे दिसून न आल्यास संबंधितास १४ दिवसासाठी घरात विलगीकरण (Home Quarantine) करण्यात यावे व तसा शिक्का संबंधिताच्या दोन्ही हातावर मारण्यात यावा.

अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था, लातूर, जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. लातूर, आरोग्य अधिकारी, म.न.पा. लातूर यांनी समन्वयाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

या आदेशाचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१, ५५, ५७ तसेच साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये दिलेल्या तरतुदीनुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार तसेच महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२० च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. सदरहू आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

(जी. श्रीकांत) भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण लातूर**

**I] प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादरः-**
१. मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद

**II] प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव**
१. पोलीस अधीक्षक, लातूर
२. आयुक्त, लातूर शहर महानगरपालिका, लातूर
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. लातूर
४. सर्व उपविभागीय अधिकारी लातूर जिल्हा
५. सर्व तहसिलदार, लातूर जिल्हा
६. अधिष्ठाता, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था, लातूर
७. जिल्हा माहिती अधिकारी, लातूर
८. जिल्हा शल्य चिकित्सक, लातूर
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, लातूर
१०. आरोग्य अधिकारी, म.न.पा. लातूर शहर

Phone: (02382-220204, 224001) Fax: (02382-222330)
Website: www.latur.nic.in, E-mail: laturcollector@gmail.com, rdclatur@gmail.com , ddmolatur@gmail.com